महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

(महाराष्ट्रशासन उपक्रम)

CIN : U४०१०९MH२००५SGC१५३६४५

दुरध्वनीक्र.२६४७८२५२/२६४७४२११

ई-मेल:cedist.msedcl@gmail.com

वेबसाईट:www.mahadiscom.in

मुख्य अभियंता (वितरण) यांचे कार्यालय
प्लॉटक्र.जी-९,प्रकाशगड,
प्रा.अनंत काणेकरमार्ग,
वांद्रे(पूर्व),मुंबई-४०००५१.

**मु.अ.(वितरण)/भांका-१/जीप्रयो** No 12687 **दिनांक :** 07 JUN 2021

## परिपत्रक

**विषय:** डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन प्रकाश योजना अंमलबजावणी करणेबाबत.

**संदर्भ** : शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०२१/प्र.क्र.५४/ऊर्जा-५.दि. १२.०४.२०२१.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवाची १३० वी जयंती जगभरात दि. १४ एप्रिल २०२१ रोजी साजरी झाली. या जयंती निमित्त राज्यातील अनुसुचित जातीव अनुसूचित जमाती प्रवर्गातील व्यक्तींचे जीवन प्रकाशमान करण्याच्या दृष्टीने वीज जोडणी विशेष मोहिम १४.०४.२०२१ ते ०६.१२.२०२१ या कालावधीत राबविण्याचा बाब शासनाच्या विचाराधीन होती.

दि. १४ एप्रिल २०२१ ते ६ डिसेंबर २०२१ या कालावधीत अनुसुचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील अर्जदारांना प्रधान्याने महावितरणद्वारे घरगुती ग्राहकांसाठी वीज जोडणी उपलब्ध करुन देण्यासाठी "डॉ.बाबासाहेब आंबेडकर जीवन प्रकाश योजना" राबविण्याचा निर्णय संदर्भाधीन शासन निर्णयद्वारे घेण्यात आला आहे.

या योजनेत अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीच्या असंघटित उद्योगामधील वीज पुरवठयासंबधी असणाऱ्या तक्रारी / समस्यांचे निवारण करण्याबाबतही समावेश आहे.

**"डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन प्रकाश योजना" अंमलबजावणी बाबतची कार्यपध्दती व मार्गदशक सूचना :**

- **या योजनेतील घरगुती वीज जोडणी करणाऱ्या लाभार्थ्यांची अनुज्ञेयता खालीलप्रमाणे राहील :-**

१. लाभार्थी अर्जदाराकडे सक्षम प्राधिकाऱ्याचे जाती प्रमाणपत्र आवश्यक राहील.

२. महावितरण कंपनीस वीज जोडणीकरीता करण्यात येणाऱ्या विहित नमुन्यानुसार अर्जाकरीता आवश्यक कागदपत्रे जसेकी, आधारकार्ड, रहिवासी दाखला इत्यादी असणे आवश्यक असेल.

३. अर्जदारांनी अर्ज केल्याच्या ठिकाणी यापूर्वीची थकबाकी नसावी.

४. सध्या पैसे भरुन प्रलंबित असलेल्या अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती अर्जदाराचासुध्दा विचार करण्यात यावा.

- **योजनेत सहभागी होण्याची कार्यपध्दती :-**

१. लाभार्थी अर्जदाराने महावितरणच्या विहित नमुन्यात कागदपत्रासह अर्ज करणे आवश्यक आहे.
२. अर्जदाराने शासन मान्य विद्युत कंत्राटदारांकडून वीज मांडणीचा चाचणी अहवाल अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
३. लाभार्थ्याने रु. ५००/- इतकी अनामत रक्कम महावितरणकडे एक रक्कमी जमा करणे अथवा सदर रक्कम ५ समान मासिक हफ्त्यांमध्येच वीज बिलातून भरण्याची सुविधा दयावी.
४. अर्जदारांचा परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यानंतर मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या या संदर्भातील अस्तित्वात असणाऱ्या तरतुदीच्या अधीन राहून वीज जोडणी देण्यात यावी.
५. महावितरणद्वारे प्राप्त अर्जानुसार ज्या अर्जदाराच्या घरी वीज जोडणी नाही अशा लाभार्थ्यांना विद्युत पायाभूत सुविधा उपलब्ध असल्यास १५ कार्यालयीन दिवसात वीज जोडणी उपलब्ध करुन देण्यात यावी.
६. जेथे अर्जदारास वीज जोडणीकरीता विद्युत पायाभूत सुविधा उपलब्ध करावी लागणार असल्यास अशा ठिकाणी महावितरणद्वारे स्वनिधी अथवा जिल्हा नियोजन विकास निधी (विशेष घटक योजना तथा आदिवासी उपयोजनासहीत) अथवा इतर उपलब्ध होऊ शकणाऱ्या निधी मधून प्राधान्याने हाती घेऊन पूर्ण करण्यात येवून वीज जोडणी उपलब्ध करण्यात यावी.

- **असंघटीत उद्योगामधील वीज समस्यांचे निराकरण :-**

१. अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीच्या असंघटीत उद्योगामधील वीज समस्यांचे प्राधान्याने निराकरण होण्याच्या दृष्टीने मंडळ स्तरावर अधीक्षक अभियंता अध्यक्षतेखाली त्यांच्या कार्यक्षेत्राकरीता कृती दलाची स्थापना करण्यात यावी. अशा कृती दलात त्या कार्यक्षेत्रातील अनुसुचित जाती/ अनुसुचित जमातीचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या उद्योजकांचा समावेश करावा.
२. याबाबत मुख्य अभियंता स्तरावर दर महिन्यांनी आढावा घेण्यात यावा.
३. या योजनेची महावितरणद्वारा प्रसिध्दी करण्यात यावी.
४. या योजनेचे संनियत्रण व आढावा मुख्यालय स्तरावरुन त्रैमासिकरित्या घेण्यातयेईल.
५. यातून फलनिष्पत्तीचा अहवाल दर महिन्यास मुख्य अभियंता (वितरण) विभागास सादर करण्यात यावा.

- **योजनेसाठी निधीची उपलब्धता :-**

या योजनेसाठी लागणारा निधी, महावितरण कंपनीने स्वनिधी / जिल्हा विकास समितीचा निधी (विशेष घटक योजना तथा आदिवासी उपयोजनासहीत) / कृषी आकस्मिकता निधी मधून उपलब्ध करण्यात यावा.

या योजनेचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर याबाबत यशस्वी गाथा व त्रुटी आढळल्यास त्याचा फलनिष्पती अहवाल शासनास सादर करण्याच्या सूचना करण्यात येत आहेत. तसेच, उपरोक्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर जीवन प्रकाश योजनेची योग्य अंमलबजावणी होईल, याबाबत दक्षता घेण्यात यावी.

**सहप्रत्र :** वरील प्रमाणे शासन निर्णय

**मुख्य अभियंता (वितरण)**

**प्रत सविनय सादर :**

१. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. मुंबई.
२. संचालक (संचालन), म.रा.वि.वि.कं.मर्या. मुंबई.
३. संचालक (वित्त), म.रा.वि.वि.कं.मर्या. मुंबई.
४. संचालक (प्रकल्प), म.रा.वि.वि.कं.मर्या. मुंबई.
५. संचालक (वाणिज्य), म.रा.वि.वि.कं.मर्या. मुंबई.
६. संचालक (मा.सं.), म.रा.वि.वि.कं.मर्या. मुंबई.
७. सहव्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. कल्याण, औरंगाबाद
८. क्षेत्रीयसंचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. नागपूर/ पुणे
९. कार्यकारी संचालक (सुरक्षा व अंमलबजावणी) म.रा.वि.वि.कं.मर्या. हॉंगकॉंग बँक इमारत, मुंबई.
१०. कार्यकारी संचालक - २(वितरण) /३ (पायाभूत आरखडा)/ ४ (प्रकल्प)/ (देयक व महसूल) / (वित्त) म.रा.वि.वि.कं.मर्या. मुंबई.

**प्रत सस्नेह रवाना :**

१. मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.म., (सं. व सु.) सर्व परिमंडळ कार्यालये.
२. खाते प्रमुख मुख्य कार्यालय, मुंबई.

**प्रत रवाना :-**

सर्व अधिक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कं.म., (सं. व सु.) मंडळ कार्यालये.

As per mailing list.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर
जीवन प्रकाश योजना.

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-२०२१/प्र.क्र.५४/ऊर्जा-५**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- १२ एप्रिल, २०२१.

**प्रस्तावना:-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे शोषित व उपेक्षितांचे मुक्तिदाते म्हणून सुपरिचित आहेत. विपरित परिस्थितीत त्यांनी देश व विदेशातून उच्च शिक्षण प्राप्त करून एक नवा आदर्श निर्माण केला आहे. याच शिक्षणाच्या बळावर शोषित, उपेक्षित घटक व एकूणच समग्र भारतीयांच्या जीवनात क्रांतीकारक बदल घडवून आणले व एक प्रकारे आधुनिक भारताची पायाभरणी केली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाची १३० वी जयंती जगभरात दि.१४ एप्रिल २०२१ रोजी साजरी होत आहे. या जयंती निमित्त राज्यातील अनुसुचित जाती, जमाती प्रवर्गातील व्यक्तींचे जीवन प्रकाशमान करण्याच्या दृष्टीने वीज जोडणी विशेष मोहिम दि.१४ एप्रिल २०२१ ते दि.६ डिसेंबर २०२१ या कालावधीत राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

**उद्दिष्ट :-**

दि.१४ एप्रिल २०२१ ते ६ डिसेंबर २०२१ या कालावधीत अनुसुचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील अर्जदारांना प्राधान्याने महावितरणद्वारे घरगुती ग्राहकांसाठी वीज जोडणी उपलब्ध करून देण्यासाठी "डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन प्रकाश योजना" राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

याशिवाय या योजनेत अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीच्या असंघटित उद्योगामधील वीज पुरवठयासंबधी असणा-या तक्रारी/ समस्यांचे निवारण करण्याबाबतही समावेश असेल.

**लाभार्थ्यांची अनुज्ञेयता :-**

या योजनेतील घरगुती वीज जोडणीकरणा-या लाभार्थ्यांची अनुज्ञेयता खालीलप्रमाणे राहील :-
१. लाभार्थी अर्जदाराकडे सक्षम प्राधिकाऱ्याचा जाती प्रमाणपत्र आवश्यक राहील.
२. महावितरण कंपनीस वीज जोडणीकरीता करण्यात येणा-या विहित नमुन्यानुसार अर्जाकरीता आवश्यक कागदपत्रे जसे की, आधार कार्ड, रहिवासी दाखला इत्यादी असणे आवश्यक असेल.
३. अर्जदारांनी अर्ज केल्याच्या ठिकाणी यापूर्वीची थकबाकी नसावी.

**योजनेची कार्यपध्दती :-**

१. लाभार्थी अर्जदाराने महावितरणच्या विहित नमुन्यात कागदपत्रासह ऑनलाईन अथवा ऑफ लाईन अर्ज करील.
२. अर्जदाराने शासनमान्य विद्युत कंत्राटदारांकडून वीज मांडणीचा चाचणी अहवाल अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

३. लाभार्थ्याने रू.५००/- इतकी अनामत रक्कम महावितरणकडे जमा करणे आवश्यक राहील. सदर रक्कम ५ समान मासिक हफ्त्यांमध्येच भरण्याची सुविधा असेल.

४. अर्जदारांचा परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यानंतर मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या या संदर्भातील अस्तित्वात असणा-या तरतुदीच्या अधीन राहून वीज जोडणी उपलब्ध करण्यात येईल.

५. महावितरणद्वारे प्राप्त अर्जानुसार ज्या अर्जदाराच्या घरी वीज जोडणी नाही अशा लाभार्थ्यांना विद्युत पायाभूत सुविधा उपलब्ध असल्यास पुढील १५ कार्यालयीन दिवसात वीज जोडणी उपलब्ध करण्यात येईल.

६. तसेच जेथे अर्जदारास वीज जोडणीकरीता विद्युत पायाभूत सुविधा उपलब्ध करावी लागणार असल्यास अशा ठिकाणी महावितरणद्वारे स्वनिधी अथवा जिल्हा नियोजन विकास निधी (विशेष घटक योजना तथा आदिवासी उपयोजना सहीत) अथवा इतर उपलब्ध होऊ शकणाऱ्या निधी मधून प्राधान्याने हाती घेऊन पूर्ण करण्यात येईल व वीज जोडणी उपलब्ध करण्यात येईल.

७. याशिवाय अनुसुचित जाती व अनुसुचित जमातीच्या असंघटीत उद्योगामधील वीज समस्यांचे प्राधान्याने निराकरण होण्याच्या दृष्टीने महावितरण स्तरावर प्रत्येक मंडळातील किंवा जिल्हा स्तरावर अधीक्षक अभियंता अध्यक्षतेखाली त्यांच्या कार्यक्षेत्राकरीता कृती दलाची स्थापना करण्यात येईल. अशा कृती दलात त्या कार्यक्षेत्रातील अनुसुचित जाती/ अनुसुचित जमातीचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या उद्योजकांचा समावेश असावा. मुख्य अभियंता स्तरावर याचा दर महिन्यांनी आढावा घेण्यात येईल.

८. या योजनेतील तक्रारीचे निराकरण होण्याच्या दृष्टीने महावितरण स्तरावर समर्पित वेब पोर्टल निर्माण करण्यात येईल.

९. या योजनेची महावितरणद्वारा प्रसिध्दी करण्यात येईल.

१०. या योजनेचे संनियत्रण व आढावा अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महावितरणद्वारा आवश्यकतेनुसार परंतु किमान त्रैमासिकरित्या घेण्यात येईल यातून झालेली फलनिष्पत्तीचा अहवाल शासनास दर महिन्यास सादर करेल.

११. या योजनेसाठी लागणारा निधी महावितरण स्वनिधी/ जिल्हा विकास समितीचा निधी(विशेष घटक योजना तथा आदिवासी उपयोजना सहीत)/कृषी आकस्मिकता निधी मधुन करता येईल.

१२. या योजनेचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर याबाबत यशस्वी गाथा व त्रुटी आढळल्यास त्याचा फलनिष्पती अहवाल शासनास सादर करण्याच्या सूचना करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०२१०४१२१९१७२३९९१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prashant Pundlik Badgeri

(प्रशांत पुं.बडगेरी)

उप सचिव

**प्रत :-**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,

२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.

३. मा. उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधान परिषद/विधानसभा.
५. मा. मंत्री (ऊर्जा) नवीन व नवीकरणीय ऊर्जा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
६. मा. राज्यमंत्री (ऊर्जा) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
७. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
८. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
९. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
१०. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, प्रकाशगड, वांद्रे पूर्व मुंबई ४०००५१.
११. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी, प्रकाशगड, वांद्रे पूर्व मुंबई ४०००५१.
१२. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनी, प्रकाशगंगा, वांद्रे पूर्व मुंबई ४०००५१.
१३. महासंचालक, महाऊर्जा पूणे.
१४. अवर सचिव (रोख शाखा) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
१५. अवर सचिव (उर्जा ३) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
१६. कक्ष अधिकारी (प्रशा १) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय मुंबई ४०००३२.
१७. निवड नस्ती ऊर्जा -५.